साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १० वे अंक - ४ था

जानेवारी ते मार्च - २०२०

भाग - २

UGC CARE Listed Journal

ISSN 2231-573X

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

❖ संपादक ❖

डॉ. शिवाजी हुसे

मराठी विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

Scanned with CamScanner

वर्ष - ९० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

# अनुक्रमांक (भाग - २)


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत साहित्य अध्ययन आणि अध्यापन<br>**प्रा. महारुद्र जगताप** | १-३ |
| २ | संतसाहित्य आणि दलित साहित्य : एक अनुबंध<br>**डॉ. रामचंद्र झाडे** | ४-६ |
| ३ | संतांची प्रबोधन चळवळ<br>**डॉ. कैलास इंगळे** | ७-१० |
| ४ | ज्ञानेश्वरांचा चिद्‌विलासवाद, शंकराचार्यांचा मायावाद व रामानुजांचा विशिष्टाद्वैतवाद : अन्वय<br>**डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे** | ११-२० |
| ५ | संत तुकारामांचे मध्ययुगीन मराठी साहित्यातील स्थान<br>**प्रा. डॉ. अनिल गर्जे** | २१-२५ |
| ६ | संत साहित्याची सार्वकालिकता<br>**डॉ. जयदेवी पवार** | २६-३० |
| ७ | संत तुकारामाचे सामाजिक आणि आध्यात्मिक योगदान<br>**प्रा. डॉ. गजानन जाधव** | ३१-३५ |
| ८ | समताधिष्ठत महानुभव पंथात दलिताचे स्थान<br>**प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे** | ३६-४० |
| ९ | संत साहित्यातील दलित जाणीव<br>**डॉ. रामलिला सुदामराव पवार** | ४१-४७ |
| १० | मराठवाड्यातील संत परंपरा : एक दृष्टिकोण<br>**डॉ. उमेश मुंढे**<br>**प्रा. शिवचरण गिरी** | ४८-५४ |
| ११ | संत ज्ञानेश्वराच्या पसायदानाची विश्वात्मकता - अध्ययन, अध्यापन, संशोधन<br>**प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे** | ५५-५८ |
| १२ | संत तुकारामांच्या अभंगातील पुरोगामित्वाची धारणा<br>**प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे** | ५९-६२ |


Scanned with CamScanner

# ८. समताधिष्ठत महानुभव पंथात दलिताचे स्थान

**प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड.

साज्या जीवसृष्टला अवंतात सामवणाज्या वैदिक परंपरेने प्रत्यक्ष समाजात, माणसामाणसामध्ये भेद निर्माण करणारी मनुवादी चातुर्वण्य व्यवस्था जोपासली. या विषम समाज व्यवस्थेविरुध्द प्रथम बुध्दाने बंड करुन समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी न्यायाचे तत्वज्ञान मांडले अनेक शोषित, पिडीत, दुर्बल, शुद्रा पासून ब्राम्हणांपर्यंतच्या सदाचारी माणसांनी ते स्वीकारले. एवढेच नाही तर अनेक राजे महाराजांनी या धम्माल आश्रय दिला तसेच काही धर्मांध व्यवस्थेने या धम्माला नष्ट करण्याचा प्रयत्न केला मात्र वर्णक्षेष्ठत्वाला सुरुंग लावणाज्या या धम्माचे विचार जगभर पोहचले.

बुध्दानंतर भारतीय संस्कृती चातुर्वण्य व्यवस्थेमुळे विषमतेच्या चक्रव्यूहात अडकून कर्मकांड, अंधश्रध्दा स्पृश्यअस्पृश्यता, वणक्षेष्ठतेने मानवतेची हानी करणारी ठरली. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी चातुर्वण्य व्यवस्थेविरुध्द बंड पुकारुन बुध्दिप्राण्यवादी भूमिकेतून समतेचा पुरस्कार केला. 'स्त्रीयोवेश्यास्त थाशुद्रास्तैपियातीपरा : गतिम:' असे सांगणाज्या श्रीकृष्णाला गीतेतच अडकवून वैदिकांनी स्त्रीशृद्रांना नीच मानून त्यांची अवहेलना केली. बुध्दानंतर बसवेश्वरांनी या व्यवस्थेवर घाव घालून स्त्रीशुद्रांना समानतेची वागणूक देवून मानवता जोपासली. जन्माने कोणी श्रेष्ठ कनिष्ठ ठरत नाही. माणसामाणसात समता, व्यक्तीची प्रतिष्ठा आणि श्रमप्रतिष्ठा जपणाज्या बसवेश्वरांने समाजात आमूलाग्र क्रांती केली.

याच काळात महाराष्ट्रात महानुभाव पंथाचा उद्य झाला. महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर आणि गोविंदप्रभू यांनी दलित शोषित पिडीत अन्ययग्रस्त समाजाला आपल्या कवेत घेवून समतेचा पुरस्कार केला. खरे तर चक्रधर काळात महाराष्ट्र कर्मकांड, अंधश्रध्दा, स्पृश्य, अस्पृश्यता, वर्णश्रेष्ठता, स्त्रीपुरुष भेदाने ग्रासला होता. त्यातही चातुर्वण्य व्यवस्थेत अस्पृश्य ठरविलेल्या महारमांग, चांभार, ढोर अशा जातीतील लोकांना हीनतेची मानवतेला कलंकित करणारी वागणूक दिली जात होती. स्त्रियांची स्थितीही फार चांगली नव्हती. तिलाही माणूसपणाची वागणूक मिळत नव्हती. स्त्री ही फक्त भोगवस्तू होती. तिला पुरुषाप्रमाणे स्वातंत्र्य नव्हते. उंबरठ्याच्या आत चूल आणि मुलापर्यंत तिचे जीवनविश्व होते. धर्ममोक्ष शिक्षणाचा तिला अधिकार नव्हता. समाजात बालविवाहाची प्रथा असल्यामुळे विधवा मुलींचे प्रमाण फार होते. त्यातच केशवपण सतीच्या प्रथा कधी चिते सोबत तर कधी चिता होवून जगायला मरणासन्न जिणे जगवत होती असे लाचार जिणे जगणाज्या स्त्रियांना आणि शूद्राला सन्मान देण्याचे कार्य चक्रधर गोविंदप्रभूनी केले. याच काळा मोक्षप्राप्तीचा मार्ग सांगणारा वारकरी संप्रदाय उदयास आला. या संप्रदायाने भक्ती मार्गात समता प्रस्थापित करता आली नाही. याऊलट हे ' विश्वचि माझे घर' मानणाज्या संत ज्ञानेश्वरांनी चातुर्वण्य व्यवस्थेचे समर्थन केले तसेच महाराचे पोर कडेवर घेणारा, आपल्या सोबत महारांना जेवायला बसविणारा पहिला प्रबोधकार संत एकनाथानी 'अंत्यजाचा विटाळ ज्यांशी गंगास्नाने शुध्दी त्यासी' असे म्हटले, हे संतत्वाचे शितल प्रकाश देणारे रुप चंद्राला डाग



Scanned with CamScanner

असल्या सारखे संतत्याला कलंक लावणारे आहे. महानुभाव पंथाने मात्र सर्व जातीधर्मांच्या लोकांना आपल्या पंथात सामावून घेतांना समतेचा पुरस्कार केला. समाज आणि पंथ वेगळा न ठेवता आचारा विचारातून आपला पंथ व्यापक बनविला. ब्राम्हण अनुयायीना जो सन्मान या पंथात होता तोच सन्मान शूद्र जातीतील अनुयायींना होता. ज्या स्त्रियांना संन्यास घेण्याचा अधिकार नव्हता स्त्रीपुरुष समानता नव्हती त्या स्त्री विषयीही चक्रधरांची भूमिका समतेची होती. त्यामुळे 'न स्त्री स्वातंत्र्य महती' म्हणणाऱ्या मनुवादी देशात प्रथम स्त्रियांनी संन्यास मार्ग स्वीकारुन महानुभाव पंथाला फार मोठे योगदान देवून स्त्री सामर्थ्याची ओळख निर्माण करुन दिली. महानुभाव पंथात आंधळ्याभक्तीला स्थान नव्हते तर ज्ञानयुक्त भक्तीला महत्त्व होते. समतेचा पुरस्कार करणाऱ्या चक्रधरांने स्त्री-पुरुषावादी सर्वांना आपल्या पंथात स्त्री शूद्रांना मोक्षाचा अधिकार दिला होता. स्त्रिया शास्त्र चर्चेत भाग घेत होत्या मात्र पुरुषप्रधान मनुवादी संस्कृतीत वाढलेल्या पंडितांना ही बाब खटकत हाती, ते स्त्रियांना समान मानत नव्हते त्यावर स्वामी 'तुमचा तो जीव यांचा काही जिउलिया' म्हणून त्यांना शांत करीत एकदा सारंगपाणीने हरकत घेतली तेव्हा "माग मार्गी : मैत्री, मदळसा दीलहुती चप लोकिची या पुराण प्रसिध्द ब्रम्ह - विदा नव्हता गा"१ म्हणून त्यांनी स्त्रिया विव्दान असल्याचे दाखले दिले. चक्रधरांच्या या समानतेच्या दृष्टीमुळे महदंबेसारखी पहिली विद्वान कवयत्री मराठीला मिळाली याशिवाय कमळाईसा, हिराइसा, साधाईसा, आऊसा, उमाईसा, बाईसा, धानाईसा, पोमाईसा सारख्या विव्दान स्त्रिया महानुभाव पंथाला टिकविणाऱ्या ठरल्या बुध्द, जैनानंतर स्त्रियांना महानुभाव पंथात स्थान मिळाले. भारतीय संस्कृतीत स्त्रिया दलितच होत्या अशा दलित स्त्रियांना समतेची वागणूक या पंथात मिळाली. स्त्रिया बराबर चक्रधरांच्या महानुभाव पंथात शुद्रांनाही आश्रय मिळाला. चक्रधरांनी जातपात न पाळण्याचे आदेशच आपल्या अनुयायांना दिले होते या संदर्भात त्यांच्या आयुयातील संदर्भ महानुभाव ग्रंथात आढळतात. अनुयायी भिक्षा मागायला जात त्यांना त्यानी संकेत दिले होते.'घर न निवडता भीक्षा किजे'२ चातुर्वण्य न पाळता सर्वांच्या घरची भीक्षा एकत्र करुन खाणारे महानुभवी आणि चक्रधर त्याकाळातले क्रांतिकारकच होते.

गोविंद प्रभूचा अवतार वेडापिसा असला तरी आत्मिक खेळकृतीतून त्यानी समता पाळली मातंगाच्या पाणपोईवर पाणी पिणारे (२३) गोविंदप्रभू प्रत्यक्ष महार, मागांच्या चांभाराच्या घरी जावून अन्न खाणारे चक्रधर-गोविंद प्रभू वेश्येच्या हातचे खाने खाणारे, मांगाच्या हातचे सोले आणि ऊसाचे कांडे खाणारे गोविंदप्रभू महार मांगासाठी विहीर खोदून देणारे जीव उध्दरण करणारे गोविंद प्रभू सासुरवासिनीचे माहेर असलेले रिध्दीपूरचे गोविंदप्रभूच होते. चक्रधराने दलित शोषित पिडीतांना सन्मान देणारे मानवतावादी कार्य होते. त्यांनी ब्राम्हण शुद्र असा भेद कधी केला नाही. त्यांच्या आचरणात मानवतावाद होता. महानुभव साहित्यात समतेचा पुरस्कार करणारे संदर्भ येतात. चक्रधर स्वामी म्हणतात. "उत्तम भणिजे ब्राम्हण आम अधम भणिजे मातंग ऐसे म्हणे परि तोहि मनु यदेहि चि आन नि पत्ति कारकांचे असे परिवृथा कल्पना करी"३. यावरुन असे दिसते की, गोविंदप्रभूना माणससामाणासात भेद मान्य नव्हता सर्व माणसेच आहे. गोविंदप्रभूनी माणसात उच्चनीच भेद मानला नाही एवढेच काय प्राणीमात्रातही त्यांना हा भेद मान्य नव्हता, गाय ही माय आहे तेच ब्रम्हाचे रुप आहे, असे अव्देतवादी अंधाचे डोळे उघडतांना चक्रधर स्वामी म्हणतात.



Scanned with CamScanner

"प्रवित्र म्हणिजे गाय
अपवित्र म्हणिजे सुने
एवं पशू देहीची
आन अमंगळ भक्षक
परि कैसी कल्पना करी"४

यावरुन चक्रधरांचा प्राणीमात्राविषयी आणि मानवतेविषयीचा दृष्टीकोन किती व्यापक होता हे जाणवते. अशाप्रकारे वास्तवात दीनदलित पिडीत शोषितांची सेवा केल्याचे कितीतरी प्रसंग त्यांच्या कृतीकार्यात पहावयास मिळतात. गोविंदप्रभू व चक्रधरांच्या कृतीकार्यात समानता दिसते. चक्रधरांची स्त्री पुरुष असमानता नाकारुन अनेक स्त्रियांना आपल्या पंथात आश्रय दिला. त्यांच प्रमाणे स्पृश्य, अस्पृश्य हा भेदभाव नाकारुन महार, मांगाच्या घरचे भोजन करुन अनेक महार, मांग, चांभाराना आश्रय दिला. आपल्या अनुयायांना त्यांनी आदेशच दिला होता "महार वाडा हौनि धर्मू काढावा"५ जातिभेद न पाळता महार वाड्यात जावून त्यांच्या कडून शिका व आपला धर्म तेथे वाढवा. चक्रधरांनी केवळ उपदेशच केला नाही तर महारमांगवाड्यात जावून त्यांनी साफसफाई केली. मांगाच्या हातचा लाडू प्रसाद म्हणून स्वतःखाल्ला व आपल्या अनुयायांना खायला दिला.

"मातांग ग्रही खेळू गोसावी महार वाडेयासी बीजे करीती" तैसेचि मातंगाच्या घरी करीही काही पदाथु देखती तो चाखती"६ चक्रधरांच्या लीळामध्ये असे अनेक संदर्भ मिळतात. 'चर्मकारा भेटि' या लीळा चरित्रात दलिताविषयी अनेक संदर्भ येतात तेल्याच्या घरी जेवणे, आंध्रप्रदेशी तेल्याच्या घरी थांबून सेवा घेणे (१८) गोंडवनात आदिवासीमध्ये राहून मधभाताचे भोजन करणे (२२) महाराकडून स्मशान वस्त्राचा स्वीकार करणे, (६१) रामदेवाचे वडील मरण पावल्यानंतर सुतक काळात त्यांच्या घरी जेवण, रजस्वला काळातही स्त्रीच्या हातचे जेवण अशा कितीतरी संदर्भातून चक्रधराने आचारविचार दलितांना जवळ करुन समानतेची वागणूक देणारे होते.

लीळा चरित्राप्रमाणे दृष्टांत पाठातही दलित विषयक जाणिवांचा प्रत्यय येतो. कर्मचांडाळाचा दृष्टांत मध्ये जानतेयापसि वर नेणता चांगा कर्म चांडाळापसि जात चांडाळ असते. (४८) हीन कर्म करणाऱ्या माणसपेक्षा जातीने हीन असलेला माणूस श्रेष्ठ असल्याचे सांगतांना जातिश्रेष्ठत्वाला महत्व न देता कर्माला महत्व दिले. माणूस जातीवरुन श्रेष्ठ ठरत नसून कर्माने श्रेष्ठ कनिष्ठ ठरतो हे मानवतेचे तत्वज्ञान या दृष्टांतात समर्पकपणे मांडताना ते म्हणतात. "कव्हाणी एकु कर्म चांडाळा ब्राम्हण असे तो माहारासी विटाळे, तयाचे म्हणीये करी! सीक नाडे, तेते करी, तयापे कार्य प्रयोजन होए तथा काज भोज होए तै तयासि तयांची पंती नाही !"

तयाचीये जातीची पंडित नाही, तेयासि खापरी अन्न बाहीरि घालीति" या दृष्टांतात ज्ञानी परुष जेव्हा अज्ञानी पुरुषासारखा वागतो तेव्हा अशा जाणत्यापेक्षा नेणता चांगला असल्याचे म्हटले आहे.

महानुभवाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी आणि गोविंद प्रभूच्या आचार विचारात समात व ज्ञानयुक्त बुद्धिप्रामाण्यवादी भक्तीमुळे वैदिक परंपरेतील भोंदुगिरी विषमता आणि अस्पृश्यतेला कंटाळून अनेक दलित शोषित पिडित



Scanned with CamScanner

स्त्रिया, उच्चवर्णियाही मोठ्या प्रमाणात या पंथात आले. महानुभाव पंथ सर्व जाती धर्मातील महान अनुभवी लोकाचा आचार विचाराचा सागर झाला. महानुभाव पंथाच्या प्रवर्तकाचे आचारविचार मानवतेला गवसणी घालणारे असतांना महानुभाव पंथाची वास्तविक स्थिती पाहता सवर्ण महानुभाव आणि अस्पृश्य महानुभाव अशी असमानता या पंथात दिसते. वि.भि.कोलते यांनी भंडारा जिल्ह्यातील डोंगरे नावाच्या व्यक्तीच्या घरी राहिल्यावर अस्पृश्य महानुभवाच्या स्थितीविषयी विवेचन केले आहे. अस्पृश्य महानुभवींना मठमंदिरात प्रवेश नाही, पंगतीत सोबतत जेवण नाही. सवर्ण महानुभावी अस्पृश्यता पाळतात ही या पंथाची शोकांन्तिका ठरल्याने ह्या पंथाचा विकास दिसत नाही. महानुभाव तत्वज्ञान आणि प्रवर्तकाचे आचार विचार उच्चदर्जाचे आणि मानवतावादी असतांना त्याचे अनुयायी विषमता पाळतात. खरे तर महापुरुषांचा आणि पंथाचा पराभव त्यांच्याच अनुयायांनी केलेला दिसतो.

"महानुभावी स्पृश्या कडून होणाऱ्या अत्याचाराबद्दल १९४२ ला रावसाहेब ठवरे ह्यांनी म.गांधीना पत्रात कळविले होते" मात्र त्यांनी दखल घेतली नसल्याने डॉ.रमेश आवलकरांनी नमूद केले आहे, रावसाहेब ठवरे यांनी अस्पृश्य महानुभावीची परिषद भरवून अस्पृश्य महानुभावीनां मंदिरात प्रवेश मिळावा त्यांना काळी भगवी वस्त्रे परिधान करण्यास परवानगी मिळावी, स्पृश्य अस्पृश्याचे एकत्र मेळावे भरावेत, अस्पृश्यांना महंतपद मिळावे. धान्यद्रव्य रुपातली भीक्षा न घेता स्पृश्य मंहतानी अस्पृश्याकडील शिजलेले अन्न सेवन करावे. थोडक्यात महानुभव पंथात चातुर्वण्याला थारा देवू नये, यावरुन अलिकडचे महानुभावी चक्रधराच्या आचारविचार तत्वज्ञानाची पायमल्लीच करीत असल्याचे दिसते. याचाच परिणाम महानुभाव पंथ मर्यादित झाला. या पंथाचा प्रसा आणि प्रचार योग्य झाला असता तर हा पंथ भारतभर पोहचला असता. या पंथियांच्या संकुचित वृत्तीमुळे अनेक दलित शोषित पिडीत या पंथापासून दुरावले. २० व्या शतकात डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्माची दिक्षा घेतली तेव्हा लाखो दलित शोषित पिडित या धम्मात गेले.

**निष्कर्ष**

१) १२,१३ व्या शतकात स्त्री शुद्रांना समानतेची वागणूक देणारा महानुभाव पंथ मानवतावादी पंथ ठरला.

२) चक्रधर गोविंद प्रभूनी आपल्या आचारविचारातून स्त्री शूद्रांना मानवतेची वागणूक दिली.

३) 'घर न निवडत भीक्षा किजे' या उपदेशात चातुर्वर्ण न पाळण्याचे संकेत होते.

४) 'महारवाडाहौनि धर्म काढावा या उपदेशात महार, मांग अस्पृश्यवर्गातही महानुभव धर्म पोहचवा अशी अपेक्षा होती.

५) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून कर्माने श्रेष्ठ ठरत असल्याचे तत्वज्ञान चक्रधराने मांडले.

६) चक्रधरानंतर अशा महानुभाव पंथात अस्पृश्य महानुभाव व स्पृश्य महानुभाव असा जातिभेद दिसतो.

७) स्पृश्य महानुभावीची अस्पृश्य महानुभवी विषयीची जातीय भावना महानुभाव पंथाच्या अधोगतीचे प्रमुख कारण ठरते.

**आधारभूत ग्रंथ**

१) धाबे सुशीला, महानुभाव पंथी स्त्रिया, शोधनिबंध, टोम्पे कॉलेज चांदूर.

२) नागपूरकर श्रीकृष्णमुनी, शोधणी सूत्रपाठ, अहिरे प्रकाशन मुंबई, १८८५ आचार ७७.



Scanned with CamScanner

३) आवलकर रमेश, शोध संवाद, साहित्यसेवा प्रकाशन औरंगाबाद १९९३ पृ.५३.

४) तत्रैव ५०

५) कोलते वि.भी श्री गोविंद प्रभू चरित्र, अरुण प्रकाशन, अमरावती १९७१ ली.क्र.४४

६) पठाण यु.म.संपा.दृष्ठांतपाठ - चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २००४ दृष्टांत ४८

७) आवलकर रमेश, शोधसंवाद पृ.क्र.५३

८) तत्रैवा लीळा ४६

९) नागपूरकर, शोधणीचा सूत्रपाठ, आचार १४९.

१०) तत्रैवा, आचार ८१

Scanned with CamScanner